## महाराष्ट्र वन सेवा परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील** :

**१.१** राज्य शासनाच्या वनसेवेतील राजपत्रित, गट-अ व गट-ब ची पदे.

**१.२ जाहिरात/अधिसूचनेमध्ये भरावयाच्या पदांचा व आरक्षणाबाबतचा तपशील देण्यात येईल. पदसंख्या व आरक्षण शासनाने कळविल्यानुसार राहील व विज्ञापनेत प्रसिद्ध केले जाईल.**

(१) **नियुक्तीचे ठिकाण** : महाराष्ट्रात कोठेही.

(२) **वेतनबँड व ग्रेड वेतन** –

(एक) **सहायक वनसंरक्षक, गट-अ - रुपये** - ९३००-३४८००,५००० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

(दोन) **वनक्षेत्रपाल, गट-ब - रुपये** -९३००-३४८००,४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

(३) **उच्च पदावर बढतीची संधी** - ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र वन सेवेतील वरिष्ठ पदावर.

**२. परीक्षेचे टप्पे** :-

**२.१** प्रस्तुत परीक्षा खालील एकूण तीन टप्प्यात घेण्यात येते :-

(१) पूर्व परीक्षा - २०० गुण. (२) मुख्य परीक्षा - ६०० गुण. (३) मुलाखत - ७५ गुण

**२.२ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी घेण्यात येते.** या करीता पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते. पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणारी नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

**२.३ मुख्य परीक्षेकरीता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतील.**

**२.४** जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३. अर्हता** :

**३.१ शैक्षणिक अर्हता** :

**३.१.१** खालील विषयांपैकी कमीत कमी एका विषयाची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी :-

(१) वनस्पतीशास्त्र (२) रसायनशास्त्र (३) वनशास्त्र (४) भूशास्त्र (५) गणित (६) भौतिकशास्त्र (७) सांख्यिकी (८) प्राणिशास्त्र (९) उद्यानविद्या किंवा

**३.१.२** कृषि, अभियांत्रिकी, पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र यातील स्नातक पदवीधर

**३.२ शारिरीक मानके** :-

**३.२.१** अनुसूचित जमातीतील उमेदवार वगळून इतर उमेदवारांकरीता :-

| पुरुष | महिला |
|---|---|
| **उंची** – १६३ सें.मी (अनवाणी) (कमीत कमी)<br>**छाती** – न फुगविता ७९ सें.मी. कमीत कमी फुगविण्याची क्षमता ५ सें.मी. आवश्यक | **उंची** – १५० (अनवाणी) (कमीत कमी)<br>**छाती** – न फुगविता ७४ सें.मी. कमीत कमी फुगविण्याची क्षमता ५ सें.मी. आवश्यक |

**३.२.२ अनुसूचित जमातीतील उमेदवारांकरीता :-**

| पुरुष | महिला |
|---|---|
| **उंची** – १५२.५ सें.मी (अनवाणी) (कमीत कमी)<br>**छाती** – न फुगविता ७९ सें.मी. कमीत कमी फुगविण्याची क्षमता ५ सें.मी. आवश्यक | **उंची** – १४५ (अनवाणी) (कमीत कमी)<br>**छाती** – न फुगविता ७४ सें.मी. कमीत कमी फुगविण्याची क्षमता ५ सें.मी. आवश्यक |

**३.२.३ दृष्टि :-** सुधारणेनंतर (After Correction) ४ + OD सह प्रत्येक डोळयाची दृष्टितीक्ष्णता (Visual Acuity) ६/६ असावी. बाह्य डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

३.२.४ पुरुष व महिला उमेदवारांनी अनुक्रमे २५ कि.मी. व १४ कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणेआवश्यक.

**३.२.५ मराठीचे ज्ञान आवश्यक.**

३.३ अर्जातील माहितीच्या आधारे शारिरीक मोजमापे लक्षात घेवून लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे शारीरिक मोजमाप चाचणीसाठी उमेदवाराचा विचार केला जाईल. विहित शारीरिक मोजमापे अर्जामध्ये आढळून न आल्यास शारीरिक मोजमाप चाचणीसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

३.४ प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे व वैद्यकीय चाचणी शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक मोजमापे न भरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

३.५ पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

## ४. शुल्क (फी ) :

४.१ प्रस्तुत भरतींकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | रुपये | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग |
| (१) | पूर्व परीक्षा | २६० | १३५ |
| (२) | मुख्य परीक्षा | ४१० | २१० |

४.२ वि.जा.(अ),भ.ज.(ब),वि.मा.प्र.,भ.ज.(क),भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मध्ये मोडणाऱ्या म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४.५ लाखांपेक्षा अधिक आहे, अशा उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करुन भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

## ५. पूर्व परीक्षा :

**५.१ परीक्षा योजना** :

(१) **प्रश्नपत्रिका** : एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय (संकेतांक ०११) | गुण व प्रश्न संख्या | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| सामान्य ज्ञान व गणित | १०० | पदवी | मराठी - इंग्रजी | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | १०० | शालांत | इंग्रजी | | |

(२) **अभ्यासक्रम** : सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**५.२ परीक्षा केंद्र** :

(१) खालील चार ठिकाणी परीक्षा घेण्यात येते :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

(२) विहित पद्धतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवाराने केलेल्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

(३) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

(४) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(५) जर एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शक ले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

(६) एकदा निवडलेल्या केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.३ पूर्व परीक्षेचा निकाल** :

**५.३.१** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी १० पट उमेदवार उपलब्ध होतील अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line ) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी तसेच महिला, अपंग, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**५.३.२** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.३.३** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.३.४** अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर व आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.३.५** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**५.३.६** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा** :

**६.१ परीक्षेस प्रवेश** :

**६.१.१** पूर्व परीक्षेकरीता विहित केलेल्या मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.१.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून चलनाद्वारे परीक्षाशुल्क सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.१.३** प्रस्तुत पदाच्या पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता मुख्य परीक्षेकरिता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**६.२ परीक्षा योजना** :

**६.२.१ परीक्षेचे टप्पे** : दोन. लेखी परीक्षा - ६०० गुण व मुलाखत- ७५ गुण.

**६.२.२ प्रश्नपत्रिका** :- **चार. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-**

**६.२.३ प्रश्नपत्रिकेचे स्वरुप** :- प्रस्तुत लेखी परीक्षेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे चार अनिवार्य प्रश्नपत्रिका असतील **:-**

| संकेतांक क्रमांक | प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | दर्जा | कालावधी | गुण | माध्यम | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ००१ | पेपर-१ (अनिवार्य) | मराठी | उच्च माध्यमिक परीक्षेसमान | तीन तास | १०० | मराठी | पारंपरिक |
| ००३ | पेपर-२ (अनिवार्य) | इंग्रजी | उच्च माध्यमिक परीक्षेसमान | तीन तास | १०० | इंग्रजी | पारंपरिक |
| | पेपर-३ | वैकल्पिक विषय-१ | पदवी | तीन तास | २०० | इंग्रजी | पारंपरिक |
| | पेपर-४ | वैकल्पिक विषय-२ | पदवी | तीन तास | २०० | इंग्रजी | पारंपरिक |
| | | | लेखी परीक्षेचे एकूण गुण | | ६०० | | |

**६.२.४** खालील परिच्छेद क्रमांक ६.२.५ मध्ये नमूद केलेल्या निर्बंधित विषयांच्या जोडया वगळता पुढील यादीतून कोणतेही दोन वैकल्पिक विषयाची जोडी निवडता येईल :-

| विषय | संकेतांक |
|---|---|
| कृषि | १०१ |
| वनस्पतीशास्त्र | ६०१ |
| रसायनशास्त्र | ६०२ |
| स्थापत्य अभियांत्रिकी | ४०३ |
| भूशास्त्र | ६०३ |
| कृषि अभियांत्रिकी | १०२ |
| रासायनिक अभियांत्रिकी | ४०८ |
| गणित | ६०४ |

| विषय | संकेतांक |
|---|---|
| यंत्र अभियांत्रिकी | ४०६ |
| भौतिकशास्त्र | ६०६ |
| प्राणिशास्त्र | ६०९ |
| सांख्यिकी | ६०८ |
| वनशास्त्र | १०६ |
| उद्यानविद्या | १०४ |
| पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र | १०५ |

**६.२.५ वैकल्पिक विषयांचे निर्बंधित गट** :

**खालील प्रत्येक निर्बंधित गटातील विषयामधून फक्त एकच विषय निवडण्याची परवानगी असेलः-**

(१) कृषि/उद्यानविद्या/कृषि अभियांत्रिकी/पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र

(२) रसायनशास्त्र/रासायनिक अभियांत्रिकी

(३) गणित/सांख्यिकी

(४) स्थापत्य अभियांत्रिकी/यंत्र अभियांत्रिकी/कृषि अभियांत्रिकी/रासायनिक अभियांत्रिकी

**६.२.६ अभ्यासक्रम** : **सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**६.३. परीक्षा केंद्र** :

(१) मुख्य परीक्षा खालील चार ठिकाणी घेण्यात येते **:-**

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

(२) विहित पद्धतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवाराने केलेल्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

(३) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

(४) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(५) जर एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

(६) एकदा निवडलेल्या केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**७. लेखी परीक्षेचा निकाल** :-

७.१ भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी २ ते ३ पट उमेदवार मुलाखतीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

७.२ प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

७.३ अमागास उमेदवाराकरिता लेखी परीक्षेमध्ये किमान ३५% गुण, तर मागास उमेदवाराकरिता किमान ३०% गुण प्राप्त होणे आवश्यक राहील. तसेच, गुणवत्ताधारक पात्र खेळाडूंकरिता लेखी परीक्षेमध्ये किमान २०% गुण प्राप्त होणे आवश्यक राहील. तथापि, उमेदवारास वरीलपैकी कोणतीही एकच सवलत मिळेल.

७.४ लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.तसेच, मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

७.५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**८. मुलाखत** :-

८.१ वरील परिच्छेद क्रमांक ७ नुसार पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. मुलाखत ७५ गुणांची असेल.

८.२ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात / अधिसूचनेतील अर्हता / अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल. विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

८.३ मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

**९. पदांचा पसंतीक्रम :-**

लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या व जाहिरात / अधिसूचनेत विहित केलेल्या अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांना संबंधित परीक्षेमधून भरावयाचा पदांचा पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने देणे आवश्यक राहील. अशा प्रकारे पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल :-

(१) पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

(२) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

(३) आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास अधिसूचनेत नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे, असे समजण्यात येईल व त्यात नंतर बदल करण्याची संधी देण्यात येणार नाही.

**१०. अंतिम निकाल** :- लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमध्ये समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**११. शिफारस** :-

**११.१** "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**११.२** मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते कळविण्यात येईल व शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील.

**१२. परिविक्षा कालावधी व प्रशिक्षण** :-

**१२.१** सहायक वनसंरक्षक, गट-अ- परिविक्षाधिन कालावधी ३ वर्षाचा असेल, ज्यामध्ये सहायक वन संरक्षकाच्या प्रशिक्षण पाठ्यक्रमाचा २ वर्षाचा कालावधी व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी निश्चित केल्याप्रमाणे १ वर्ष क्षेत्रीय प्रशिक्षणाचा समावेश असेल.

**१२.२** वनक्षेत्रपाल, गट-ब- परिविक्षाधीन कालावधी **३** वर्षाचा असेल. ज्यामध्ये भारत सरकारने मान्यता दिलेल्या वनशास्त्र प्रशिक्षण महाविद्यालयातील दोन वर्षाचे प्रशिक्षण व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर किंवा मुख्य वनसंरक्षक (प्रशासन) यांनी ठरविल्याप्रमाणे **१** वर्ष क्षेत्रीय प्रशिक्षणाचा समावेश असेल.

**१३. बंधपत्र** :- निवड झालेल्या उमेदवारांना वनशास्त्र प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणाकरीता पाठविण्यात येईल. सदर प्रशिक्षणाचा खर्च शासनाकडून करण्यात येणार असून, उमेदवारास प्रशिक्षण कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर किमान **५** वर्षे शासन सेवा करण्याबाबत वैयक्तिक बंधपत्र दोन जामीनदारांसह द्यावे लागेल. वैयक्तिक बंधपत्राच्या अटी व शर्तीची पूर्तता न करणा-या किंवा गैरवर्तनाच्या कारणास्तव अयोग्य असल्याचे आढळणा-या उमेदवारास शासनाने प्रशिक्षणासाठी खर्च केलेली सर्व रक्कम व्याजासह परत करावी लागेल.

************